# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ३१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२८ जुलै, २०२३ दुपारी १२:०० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभेची ३१ वी बैठक मंगळवार, दि.२८ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. प्रभारी कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) राजनीश कामत - प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुभाना कांबळे, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>प्रभारी अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सचिन श्यामसुंदर लड्डा,<br>संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १०) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर<br>(मा. प्रभारी शिक्षण संचालक (उ.शि.), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी) | सदस्य | अनुपस्थित |
| ११) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | श्री. चंद्रकांत गोपाल गार्डी, प्र. संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे, प्र.संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग | सदस्य | उपस्थित |
| १५) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| १७) | प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | उपस्थित |
| १८) | प्राचार्य डॉ. सत्यजित कांतिलाल शाह | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १९) | प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर | सदस्य | उपस्थित |
| २०) | प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिरा कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| २१) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| २२) | श्री. अजिंक्यराणा राजन पाटील | सदस्य | अनुपस्थित |
| २३) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | उपस्थित |
| २४) | श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे | सदस्य | उपस्थित |
| २५) | श्री. वैभव रणजित गांधी | सदस्य | अनुपस्थित |
| २६) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| २७) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| २८) | डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | सदस्या | उपस्थित |
| २९) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य | उपस्थित |
| ३०) | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य | उपस्थित |
| ३१) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | सदस्य | उपस्थित |
| ३२) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ३३) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३४) | डॉ. नितीन लहानू तळपाडे | सदस्य | उपस्थित |
| ३५) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३६) | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | सदस्य | उपस्थित |
| ३७) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | सदस्या | उपस्थित |
| ३८) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ३९) | डॉ. विकास दादाभाऊ कडू | सदस्य | उपस्थित |
| ४०) | डॉ. श्रीमती माया जगदीश पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४१) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य | उपस्थित |
| ४२) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य | उपस्थित |
| ४३) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | सदस्य | उपस्थित |
| ४४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| ४५) | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | सदस्य | उपस्थित |
| ४६) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| ४७) | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्या | उपस्थित |
| ४८) | श्री. यतिराज चंद्रकांत होनमाने | सदस्य | उपस्थित |
| ४९) | ॲड. नीता सुरेशबाबू मंकणी | सदस्या | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| ५०) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | सदस्या | उपस्थित |
| ५१) | श्री. संजय नामदेव साळुंखे | सदस्य | उपस्थित |
| ५२) | श्री. सुदर्शन मसु यादव | सदस्य | उपस्थित |
| ५३) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य | उपस्थित |
| ५४) | श्री. माधव धोंडोपंत देशपांडे | सदस्य | उपस्थित |
| ५५) | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | सदस्य | उपस्थित |
| ५६) | प्रा. डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | सदस्य | उपस्थित |
| ५७) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | सदस्य | उपस्थित |
| ५८) | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्या | उपस्थित |
| ५९) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | सदस्या | उपस्थित |
| ६०) | श्रीमती माधवी श्रीपाद पारेकर | सदस्या | उपस्थित |
| ६१) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | सदस्य | उपस्थित |
| ६२) | श्री. राम सातपुते, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६३) | श्री. यशवंत विठ्ठल माने, विधानसभा सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६४) | श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, विधानपरिषद सदस्य | सदस्य | अनुपस्थित |
| ६५) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**श्रध्दांजली:**

रायगड जिल्ह्यातील खालापूरनजीक असलेल्या इर्शाळवाडी येथे बुधवार, दि.१९ जुलै, २०२३ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोळसून मोठी दुर्घटना झाली, सदर दुर्घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या लोकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

प्रा. (डॉ.) राजनीश कामत हे प्रभारी कुलगुरु पदी व प्रा. (डॉ.) गौतम कांबळे हे प्र-कुलगुरु पदी रुजू झाल्यानंतर त्यांची तसेच विविध विद्याशाखांवर नव्याने नामनिर्देशित झालेले खालील प्रभारी अधिष्ठाता यांची ही पहिलीच बैठक असल्याने कुलसचिव तथा सदस्य सचिव यांनी विद्यापीठाच्या वतीने व सर्व अधिसभा सदस्यांच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

| | |
|---|---|
| डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>(प्र.अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>(प्र.अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) |
| डॉ. वसंत कोरे<br>(प्र.अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>(प्र.अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) |
| श्री. गाडी चंद्रकांत गोपाल<br>प्र.संचालक, ज्ञानस्रोत केंद्र | |



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

अनुपस्थिती:

अधिसभेच्या या बैठकीस डॉ. सचिन श्यामसुंदर लड्डा, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य व डॉ. श्रीमती माया जगदीश पाटील यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

कुलसचिवांनी मा. प्रभारी कुलगुरुंना अधिसभेच्या ३० व्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडींचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. प्रभारी कुलगुरु यांनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

| अ.क्र. | आस्थापना विभाग: |
|---|---|
| १. | **प्रभारी कुलगुरु यांची नियुक्ती:**<br>डॉ. मृणालिनी फडणवीस हे नियतवयोमानानुसार दि.०५/०५/२०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्याने मा. श्री. संतोष कुमार, मा. राज्यपाल महोदयांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई यांनी दि.०२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रा. डॉ. राजनीश कामत, यांची प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरु या पदावर नियुक्ती केलेली असून त्यास अनुसरुन प्रा. डॉ. राजनीश कामत यांनी दि.०५/०५/२०२३ रोजी कार्यभार स्विकारला. |
| २. | **प्र-कुलगुरु पदाची नियुक्ती:**<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.२४/०५/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाला अनुसरुन दि.२४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रा. डॉ. गौतम कांबळे यांची प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु पदावर नियुक्ती केलेली आहे. त्यास अनुसरुन प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी प्र-कुलगुरु यांनी दि.२४/०५/२०२३ रोजी कार्यभार स्विकारला. |
| ३. | **संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदावरील नामनिर्देश:**<br>प्रस्तुत विद्यापीठाच्या आस्थापनेवरील संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदावर विहीत प्रक्रिया करुन डॉ. राजेंद्र कैलास वडजे यांचे नामनिर्देशन करण्यात आले असून त्यास अनुसरुने ते दि.०६/०५/२०२३ रोजी रुजू झाले आहेत. |
| ४. | **प्रभारी अधिष्ठाता व प्रभारी सहायोगी अधिष्ठाता यांची नियुक्ती:**<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १५ (५) नुसार दि.०९/०५/२०२३ रोजीच्या आदेशान्वये डॉ. लक्ष्मीकांत दामा-प्रभारी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. शिवाजी शिंदे-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, डॉ. वसंत कोरे-मानवविज्ञान विद्याशाखा व डॉ. राजशेखर हिरेमठ-आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा तसेच प्रभारी सहयोगी अधिष्ठाता म्हणून डॉ. प्रशांत पवार-प्रभारी अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, डॉ. ईजाज तांबोळी-मानवविज्ञान विद्याशाखा व डॉ. विठ्ठल किडगांवकर-आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. |

| | |
|---|---|
| ५. | **शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदोन्नती:**<br>१) प्रस्तुत विद्यापीठाच्या आस्थपनेवरील उपकुलसचिव या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त असलेल्या व त्या अनुषंगाने संभाव्य पध्दतीने रिक्त होणाऱ्या पदावर पदोन्नती प्रक्रिया राबविणेकामी गठीत विभागीय पदोन्नती समितीने (वर्ग १ व २) केलेल्या शिफारशीप्रमाणे कायदेशिर अभिप्राय घेणेकामी विहीत प्रस्ताव कायदा विभागाकडे सादर करण्यात येईल.<br>२) प्रस्तूत विद्यापीठाच्या आस्थापनेवरील गट क मधील सहायक कक्ष अधिकारी व त्याअनुषंगाने संभाव्य पध्दतीने रिक्त झालेल्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७/०५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद तरतुदीप्रमाणे सेवाजेष्ठतेने तात्पुरती पदोन्नती प्रक्रिया राबविण्यात आले आहे. |
| ६. | **कॅस अंतर्गत पदोन्नतीची कार्यवाही:**<br>प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत १) डॉ. लावंड अंजना संजय, सहयोगी प्राध्यापक (Under CAS), २) डॉ. चिंचोलकर रविंद्र भास्करराव, सहयोगी प्राध्यापक (Under CAS) यांची Academic Level १२ to १३A (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक), तर डॉ. धुळप विनायक पोपट, सहाय्यक प्राध्यापक Academic Level ११ to १२ (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहाय्यक प्राध्यापक निवडश्रेणी) वर शासनाने मान्यता प्रदान केलेप्रमाणे कॅस अंतर्गत पदोन्नती देण्यात आली आहे. |
| ७. | **संत नरहरी अध्यासन केंद्र:**<br>प्रस्तुत विद्यापीठात संत नरहरी अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी प्रस्ताव तयार करणेकामी गठीत समितीची पहिली बैठक दि.२५/०१/२०२३ रोजी संपन्न झाली. |
| ८. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र फॉर सोशल जस्टीस:**<br>प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र फॉर सोशल जस्टीस सुरु करण्यासाठी प्रस्ताव तयार करणेकामी गठीत त्रिसदस्यीय समितीची पहिली ऑनलाईन बैठक<br>दि.१७/०६/२०२३ रोजी संपन्न झाली. |
| ९. | **महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी रु.३ कोटी इतका निधी प्राप्त झाले:**<br>प्रस्तुत विद्यापीठात महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राची स्थापना करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१८/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता मिळाली असून, शासन निर्णय क्र.अध्यास २०१९ / प्र.क्र.९७ / विशि-२ दि.०८ फेब्रुवारी, २०२३ नुसार सदर अध्यासनाच्या स्थापनेसाठी शासनाकडून रक्कम रु.३ कोटी निधी प्राप्त झाला आहे. |
| १०. | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र स्थापनेसाठी मंजूर ३ कोटी निधीतील उर्वरित निधी प्राप्त झाला:**<br>प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी दि.२७ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु.३ कोटी निधी मंजूर झाला असून, त्यातील रु.२२,५४,०००/- इतका निधी दि.१० ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयाअन्वये तर उर्वरित रु.२,७७,४६,०००/- इतका निधी दि.०८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये प्राप्त झाला आहे. |
| ११. | **सेवापुस्तक अद्ययावत केले:**<br>प्रस्तुत विद्यापीठातील आस्थापनेवर कार्यरत सर्व शिक्षक व प्रशासकिय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तके अद्यावत करण्यात आलेले आहेत |

| | |
|---|---|
| १२. | **अंतर्गत तक्रार निवारण समितीकडील प्रकरण निकाली काढले:**<br>महाराष्ट्र शासनाच्या सूचित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठात कार्यरत महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांच्यासाठी कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ नुसार गठीत समितीकडे प्राप्त ०१ तक्रारीवर सर्वकष चौकशी करुन सदर प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. |
| १३. | **डॉ. प्रभाकर कोळेकर यांना Minor Research Project मंजूर झाले:**<br>डॉ. प्रभाकर कोळेकर, सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना ICSSR मार्फत F.No.०२/ १३४/२०२२-२३/ICSSR/RP/MN/OBC दि.२६/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये Freedom Movement of Solapur: A Socio-Historical Study An Alternative Analysis हा Minor Research Project मंजूर झाला आहे. |
| १४. | **प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील यांना INTI International University, Malaysia Visiting Fellowship मंजूर झाले:**<br>प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील, पदार्थविज्ञान संकुल यांना INTI International University, Malaysia Visiting Fellowship दि.०१/०४/२०२३ ते ३१/१२/२०२५ या कालावधीसाठी मंजूर होऊन रिसर्च फेलो म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. |
| | **अभियांत्रिकी विभाग:** |
| १५. | प्रस्तुत विद्यापीठाच्या विस्तारासाठी संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीमध्ये नव्याने बांधण्यात येणाऱ्या मुख्य प्रशासकीय व परीक्षा भवन इमारतीचे तिन्ही मजल्याचे भिंत, स्लॅब व तिन्ही मजल्याचे वीट बांधकाम पूर्ण झाले. तीन मजल्याचे फरशी बसविण्याचे काम पूर्ण झाले व तिसऱ्या मजल्यापर्यंतचे प्लास्टरचे काम पूर्ण झाले असून रंगकाम पुर्णत्वास येत आहे. |
| १६. | मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीच्या इलेक्ट्रीकफिकेशन व अग्निशामक यंत्रणा बसवण्याचे काम सुरु आहे. |
| १७. | मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन बांधणे या बांधकामासाठी राज्य शासनाकडून एकूण रक्कम रुपये ११ कोटी विद्यापीठास प्राप्त झाले आहे. |
| १८. | विद्यापीठास रुसा निधी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून विद्यापीठ परिसरात अंतर्गत भुयारी गटार योजना व मलशुध्दीकरण केंद्र बांधणेचे काम पूर्ण झाले आहे. |
| १९. | विद्यापीठास रुसा निधी अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून विद्यापीठ परिसरात मुलांचे वसतिगृहाच्या ब्लॉक "अ" व "ब" इमारतीचे पहिल्या मजल्याचे विट बांधकाम पूर्ण झाले, पहिल्या मजल्याचे स्लॅब व पहिल्या मजल्याचे फरशी बसविण्याचे काम तसेच पहिल्या मजल्याचे प्लास्टरचे काम पूर्ण झाले आहे. |
| २०. | विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या रुसा निधी अंतर्गत सर्व कामे अंतिम टप्प्यात आहेत. |
| २१. | विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात संपूर्ण परिसरास सुरक्षा भिंतचे बांधकाम सुरु आहे. |
| २२. | "खेलो इंडिया" योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या मल्टीपर्पज हॉलच्या स्थापत्य बांधकामाची कामे सुरु आहे. |
| २३. | जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, जि. पुणे येथे रुसा निधी अंतर्गत पुरातत्व वस्तु संग्रहालय व माहिती केंद्र तयार करण्याच्या कामामध्ये साईन बोर्ड, कार्पेट, फॅब्रीकेशन आणि पेटींगचे काम, फॉल सिलींगचे काम, इलेक्ट्रीकलचे काम व पडदे खरेदी करुन बसविणे इत्यादी स्थापत्य कामे तसेच फर्निचर कामामधील इंटेरिअर डिस्प्ले, कपबोर्ड युनिट व स्टोअरेज व बुक सेल्फ इत्यादी सर्व कामे पूर्ण झाली आहेत. |

| | |
|---|---|
| २४. | विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक बांधकाम व टॉवर बांधकाम इत्यादी कामे सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ सोलापूर यांच्यामार्फत सुरु आहे. |
| | **अभ्यासमंडळे विभाग:** |
| २५. | **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी:** सुकाणू समितीच्या वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तुत विद्यापीठाचा चारही विद्याशाखांचा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा आराखडा बनविण्यासाठी मा. कुलगुरुंकडून नेमण्यात आलेल्या समितींच्या बैठका घेण्यात आल्या, तयार करण्यात आलेला आराखडा अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आला. विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये चारही विद्याशाखांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. |
| २६. | **प्रस्तुत विद्यापीठाची स्थायी व अस्थायी अभ्यासमंडळे नव्याने गठीत करणे:** प्रस्तुत विद्यापीठाकडून वर्ष २०२२-२३ मध्ये सर्व स्थायी व अस्थायी अभ्यासमंडळे नव्याने गठीत करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ख) नुसार तसेच कलम ४७(२)(ट) या तरतुदीनुसार मा. कुलगुरुंकडून नामनिर्देशित सदस्यांना अभिनंदनपर पत्रे पाठविण्यात आली. |
| २७. | **शै. वर्ष २०२३-२४ पासून सुधारित करावयाचे अभ्यासक्रम:** शै. वर्ष २०२३-२४ पासून नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार पदव्युत्तर प्रथम वर्षाचे अभ्यासक्रम संबंधित विषयांच्या उपसमित्याकडून तयार करुन घेण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. |
| २८. | **सेमिनार/वर्कशॉप संदर्भात:** शै. वर्ष २०२२-२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सेमिनार/वर्कशॉप यांच्याशी संबंधित महाविद्यालयांना मा. कुलगुरू माहोदयांच्या मान्यतेने अंशत: मंजूर करण्यात आलेले अनुदान अभ्यासमंडळे विभागाकडून वितरित करण्यात आले आहेत. |
| | **व्याख्यानमाला विभाग:** |
| २९. | सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील स्मृती व्याख्यानमाला २०२३-२४ मंगळवार दि.२१/०२/२०२३ रोजी **"बँकिंग क्षेत्रातील-सहकार"** या विषयावर ऑफलाईन व ऑनलाईन प्रणालीव्दारे आयोजन करण्यात आले होते. |
| | **आयक्युएसी विभाग:** |
| ३०. | दि.२८ एप्रिल, २०२३ रोजी आयक्युएसी कमिटीचे बैठक पार पाडण्यात आली. |
| | **शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग:** |
| ३१. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ज्या महाविद्यालयाचे शैक्षणिक लेखा परिक्षण (AAA) पुर्ण झाले आहे. अशा महाविद्यालयांचे शैक्षणिक लेखा परिक्षणाचे प्रमाणपत्र तयार करुन ८३ पैकी६८ महाविद्यालयांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेले आहे. |
| ३२. | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यास शासन आदेश क्र. मान्यता-२०२३/ प्र.क्र.५६/मशि-४, दि.१५/०६/२०२३ च्या शासन आदेशान्वये नवीन पाच महाविद्यालये सुरु करण्यास मान्यता मिळाली असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे. |
| ३३. | शासनाच्या धोरणानुसार प्रस्तुत विद्यापीठाची सन २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सर्व समावेशक सम्यक योजना (बृहत आराखडा) तयार करुन शासनाने दिलेल्या वेब पोर्टलवर माहिती अपलोड केली आहे. |

| | |
|---|---|
| ३४. | शैक्षणिक वर्ष२०२३-२४ करिता सत्र आरंभ व सत्र समाप्तीचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालये यांना ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे. |
| | **परीक्षा व मूल्यमापन विभाग:** |
| ३५. | ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०२२ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका या ऑनस्क्रीन पध्दतीने तपासून घेण्यात आलेल्या आहेत. |
| ३६. | मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका स्कॅन करण्यासाठी एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना स्कॅनिंग केंद्र दिलेले आहे. |
| ३७. | मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिका या ऑनस्क्रीन पध्दतीने तपासून घेण्यासाठी संलंग्नित महाविद्यालयातील शिक्षकांसाठी १७ ऑनस्क्रीन मुल्यमापन केंद्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने On Screen Evaluation केंद्राच्या नावासमोर दर्शविलेल्या महाविद्यालयातील / संकुलातील शिक्षकांनी On Screen Evaluation केंद्राच्या नावासमोर दर्शविलेल्या महाविद्यालयातील /संकुलातील शिक्षकांनी On Screen Evaluation केंद्रावर जाऊन / महाविद्यालयातील संगणकावरुन तसेच जेथे सोईस्कर होईल तेथून शिक्षकांनी सुरक्षितात, गोपनीयता राखून उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. |
| ३८. | मार्च / एप्रिल २०२३ च्या उत्तरपत्रिका On Screen पध्दतीने तपासणी करण्याकरीता परीक्षकांचे पॅनल गोपनीय फर्मला पाठविण्यात आलेले आहेत व शिक्षकांचे कार्यालयीन आदेश ईमेलव्दारे पारित करण्यात येत आहेत. |
| ३९. | परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे ट्रान्सक्रिप्ट विद्यार्थ्यांच्या मागणी नुसार देण्यात येत आहेत. |
| ४०. | नोकरीकरिता आवश्यक असणारे सर्व शैक्षणिक गुणवत्ता प्रमाणपत्रे व्हेरिफिकेशन करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. |
| ४१. | माहे मार्च-२०२२ आणि ऑक्टो-२०२२ मधील B.O.S. चेअरमन कडुन प्राप्त प्रात्यक्षिक परीक्षेचे पॅनल व वेळापत्रक संबंधित महविद्यालयास पाठविण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात आली. |
| ४२. | नविन सॉफ्टवेअर मधील गुणपत्रिकेची प्रातिनिधिक स्वरुपात तपासणी करण्यात आली. |
| ४३. | माहे ऑक्टो-२०२२ च्या परीक्षेचे सर्व अभ्यासक्रमाचे निकाल प्रातिनिधिक स्वरुपात तपासणी करुन देण्यात आले आहेत. |
| | **वित्त व लेखा विभाग:** |
| ४४. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण पूर्ण झाले असून, त्यास वित्त व लेखा समिती, व्यवस्थापन परिषदेने केलेली मान्यतेची शिफारस स्विकारून त्यास अधिसभेने मान्यता दिली आहे. |
| ४५. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सन २०२२-२३ च्या सुधारित अंदाजपत्रकास व सन २०२३-२४ च्या मूळ अंदाजपत्रकास अधिसभेने दुरूस्तीसह मान्यता दिलेली असून सदरचे अंदाजपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. |
| ४६. | विद्यापीठात विविध बैठकांसाठी व इतर कार्यालयीन कामासाठी येणा-या प्राध्यापक व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्या प्रवास भत्ता/दैनिक भत्त्याची देयके तसेच दैनंदिन खर्चाची, विविध फर्मना द्यावयाच्या देयकाची आदायगी देखील बँक ऑफ इंडिया कार्पोरेट नेट बँकिंग द्वारे आदा करण्यात येत आहेत. |

| | |
|---|---|
| ४७. | विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना विविध कामाकरिता देण्यात येणाऱ्या तसलमातीची आदायगी तसेच इतर देयकाची आदायगी देखील बँक ऑफ इंडियाच्या कार्पोरेट नेट बँकिंगद्वारे आदा करण्यात येत आहेत. |
| ४८. | प्रस्तुत विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशिर्षक २२०२०६८३ मधून करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांनी मान्यता दिली आहे. |
| | **ज्ञानस्रोत केंद्र:** |
| ४९. | ज्ञानस्रोत केंद्राकडून खरेदी करण्यात आलेल्या Turnitine Plagiarism Software व्दारे विद्यापीठ नियमावलीनुसार इतर महाविद्यालयांना Subscription फी रु.१०,०००/- भरुन Software वापरासंबधीचा Login ID, Password व वापरासबंधीचे प्रशिक्षण ज्ञानस्रोत केंद्राकडून देण्यात येत आहे. |
| ५०. | नियमित विद्यापीठ अंदाजपत्रकातून पुस्तके व नियतकालिके खरेदीची प्रक्रीया सुरु आहे. |
| ५१. | प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्याची प्रक्रीया Online Form भरुन सुरु आहे. |
| ५२. | व्दितीय वर्ष पुर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना No Dues देण्याचे ही प्रक्रीया Online स्वरुपात फॉर्म भरुन घेऊन सुरु आहे. |
| ५३. | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्रात शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी करिता दि.३१ मे, २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त दि.३१ मे, २०२३ ते दि.०३ जून, २०२३ या कालावधीत ग्रंथ प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात आला. |
| ५४. | दि.१५ ऑक्टोंबर, २०२३ रोजी दिवाळी उत्सवात प्रकाशीत झालेल्या निवडक दिवाळी अंकाचे प्रदर्शन करुन ते वाचकांना वाचनाकरिता उपलब्ध करुन देण्यात आले. |
| ५५. | ज्ञानस्रोत केंद्राकडून नव्याने संशोधन करणाऱ्या संशोधकांसाठी मदत व्हावी या दुष्टीने शोधप्रबंध शोधगंगा या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम सुरु आहे. |
| | **क्रीडा विभाग:** |
| ५६. | सन २०२२-२३ या शैक्षणीक वर्षात पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते.<br>१) चेस -मुली - IES युनिव्हर्सिटी, भोपाल दि.१४ ते १६ फेब्रुवारी, २०२३<br>२) क्रिकेट -मुले - PDU शेखावती युनिव्हर्सिटी, राजस्थान दि.०१ ते १० फेब्रुवारी, २०२३<br>३) क्रिकेट -मुली - KIIT युनिव्हर्सिटी, भुवनेश्वर दि.१० ते १८ मार्च, २०२३ |
| ५७. | सन २०२२-२३ या शैक्षणीक वर्षात अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते.<br>१) बेसबॉल-मुले-दि आसाम रॉयल ग्लोबल युनिव्हर्सिटी, गोवाहाटी दि.१४ ते १८ फेब्रुवारी, २०२३<br>२) बेसबॉल-मुली-दि आसाम रॉयल ग्लोबल युनिव्हर्सिटी, गोवाहाटी दि.२४ ते २८ फेब्रुवारी, २०२३<br>३) बेस्ट फिजिक - मुले - येनपोया युनिव्हर्सिटी, दि.२० ते २२ फेब्रुवारी, २०२३<br>४) पॉवर लिफ्टींग -मुली - सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ हिमाचल, प्रदेश दि.०९ ते १२ मार्च, २०२३<br>५) ॲथलेटिक्स - मुले व मुली - तमिळनाडू फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस युनिव्हर्सिटी, चेन्नई दि.१३ ते १६ मार्च २०२३<br>६) वेटलिफ्टींग - मुले - युनिव्हर्सिटी ऑफ कालिकत, केरला दि.१५ ते १८ मार्च, २०२३<br>७) शुटींग § मुले - स्वामी विवेकानंद सुभ्रत युनिव्हर्सिटी, दि.०१ ते ०५ एप्रिल, २०२३<br>८) शुटींग - मुली - स्वामी विवेकानंद सुभ्रत युनिव्हर्सिटी, दि.०५ ते ०९ एप्रिल, २०२३<br>९) सॉफ्टबॉल - मुले - पंजाब युनिव्हर्सिटी, चंदिगढ दि.०५ ते ०९ एप्रिल, २०२३ |

| | |
|---|---|
| ५८. | सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (मुले) स्पर्धा दि.१३ ते १६ मार्च, २०२३ या कालावधीतील स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाच्या श्री. अरूण धनसिंग राठोड यांनी ॲथलेटिक्स - २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन (मुले) गटात सुवर्ण पदक प्राप्त केले. |
| ५९. | सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टींग (मुली) स्पर्धा दि.०९ ते १२ मार्च, २०२३ या कालावधीतील स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाच्या कु. कामिनी गणेश बोस्टे यांनी ५७ किलो वजनीगट पॉवर लिफ्टींग (मुली) गटात रौप्य पदक प्राप्त केले. |
| ६०. | सन २०२२-२३ या शैक्षणीक वर्षात खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धे अंतर्गत दि.२६ ते २९ मे, २०२३ या कालावधीत कुस्ती स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाचा श्री. शुभम रघुनाथ दुधाळ यांनी कुस्ती (मुले) - ग्रीको रोमन -८७ किलो वजनीगटात रौप्य पदक प्राप्त केले. |
| ६१. | सन २०२२-२३ या शैक्षणीक वर्षात खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स स्पर्धे अंतर्गत दि.३० मे, २०२३ ते दि.०३ जून, २०२३ या कालावधीत वेटलिफ्टींग (मुले) स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाचा श्री. ऋतुराज नामदेव गायकवाड यांनी वेटलिफ्टींग (मुले) - ९६ किलो वजनीगटात रौप्य पदक प्राप्त केले. |
| ६२. | वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स निवडचाचणी दि.१४ व १५ जून २०२३ रोजी KIIT - Deemed to be University, Bhubaneswar येथे घेण्यात आल्या सदर स्पर्धेत ॲथलेटिक्स मध्ये २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन या क्रीडा प्रकारात प्रस्तुत विद्यापीठाचे श्री. अरूण धनसिंग राठोड यांची दि.२८ जुलै, २०२३ ते ०८ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत चेंगडू (चायना) येथे होणाऱ्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स करीता निवड झाली आहे. |
| ६३. | दि.०६ ते १५ जून, २०२३ या कालावधीत पीएच. डी. पेट-८ चे शारीरिक शिक्षण विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. |
| | **राष्ट्रीय सेवा योजना:** |
| ६४. | दि.१३/०२/२०२३ ते दि.१९/०२/२०२३ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व्दारा संलग्नित शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर च्या वतीने "राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर" मौजे निमगाव, ता. अर्जुनी/मोर जि.गोंदिया या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शिबीराकरिता एकुण ०५ मुले व ०५ मुली सहभागी झाले. |
| ६५. | सन २०२२-२३ मधील "युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास" ही थीम निश्चित करून दि.१८/१२/२०२२ ते दि.१५/०२/२०२३ या कालावधीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या एकुण ६४ महाविद्यालयांपैकी ५० महाविद्यालयांचे विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले आहेत. तरी सदरच्या शिबीरामध्ये १९१४ स्वयंसेवक, २०५३ स्वयंसेविका असे एकुण ३९६७ जणांनी सहभाग नोंदविला आहे. |
| ६६. | दि.२६/०२/२०२३ ते दि.०४/०३/२०२३ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या National Integration Camp करिता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयातील एकुण ०३ स्वयंसेवक सहभागी झाले होते. |
| ६७. | दि.१३ ते १७ मार्च, २०२३ या कालावधीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणा २०२२-२३ राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीराकरिता प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमधून ०२ स्वयंसेवक ०२ स्वयंसेविका व ०१ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. |

| | |
|---|---|
| ६८. | रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष श्रमसंस्कार कार्यक्रम अनुदान वितरण व विनियोग या विषयांवर दि.२५/०२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. |
| ६९. | प्रस्तुत विद्यापीठाकडून सन २०२२-२३ रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष श्रमसंस्कार शिबीराकरिता प्राप्त झालेले १००% अनुदान प्रस्तुत विद्यापीठ रासेयो एकक असलेल्या महाविद्यालये यांना PFMS व्दारे वितरीत करण्यात आले आहे. |
| ७०. | ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाच्या वतीने आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था व सारथी युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३०/०५/२०२३ रोजी वक्तृत्व व निबंध स्पर्धा संपन्न झाली आहे. |
| ७१. | दि.०५ जून, २०२३ जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्रस्तुत विद्यापीठाच्या अतिथीगृह परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले होते. सदरच्या वृक्षारोपणादरम्यान १०१ रोपे लावण्यात आली आहेत. |
| ७२. | प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने "६ जून" हा दिवस "शिवस्वराज्य दिन" म्हणून साजरा करण्यात आला आहे. या दरम्यान शिवज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. |
| ७३. | "स्वच्छ वारी-स्वस्थ वारी-निर्मल वारी-हरित वारी" चे आयोजन दि.१२ ते २९ जून, २०२३ करण्यात आली आहे. सदरच्या आषाढी वारी निमित्त प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो स्वयंसेवक यांच्या सहभागातून दोन्ही पालखी मार्गावर प्रबोधनपर पथनाट्य, ओला कचरा व निर्माल्याचे संकलन, हागणदारी मुक्तीकरिता शौचालयाचा वापर करण्यासाठी वारकऱ्यांना प्रबोधीत करणे, स्वच्छता अभियान राबविणे, वृक्षारोपण, प्लॅस्टिक मुक्तीकरिता केळीच्या पानांचे वाटप करणे, वारकऱ्यांची मालिश करणे, स्वयंपाक करू लागणे, पिण्याच्या पाण्याचे वितरण, केळी वाटप, पोलिसमित्र म्हणून मदत करणे, वैद्यकीय शिबीरामध्ये मदत करणे असे विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. |
| ७४. | आषाढी वारी निमित्त प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने जिल्ह्यातील अकलूज, माळशिरस, वेळापूर आणि वाखरी या ठिकाणी ४ दिवस वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. |
| | **विद्यार्थी विकास विभाग:** |
| ७५. | भारतीय विश्वविद्यालय संघ आणि जैन विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ३६ वा राष्ट्रीय युवा महोत्सव बेंगलोर, कर्नाटक येथे दिनांक २४ ते २८ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान संपन्न झाला. या महोत्सवात देशातील आठ विभागातून प्रथम, व्दितीय, तृतीय आलेले १०६ विद्यापीठ संघ सहभागी झाले होते. २८ कलाप्रकारापैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे पश्चिम विभागीय युवा महोत्सवात जिंकलेले चार कलाप्रकार या राष्ट्रीय महोत्सवात सहभागी होते. |
| ७६. | स्पीक फॉर इंडीया झोनल फेरी वादविवाद स्पर्धेचे आयोजन दि.०१/०४/२०२३ रोजी देवगीरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले होते. सदर स्पर्धेत सामाजिक शास्त्र संकुलातील पत्रकारीता विभागाचा सौरभ वाघमारे हा विद्यार्थी सहभागी झाला होता. |
| ७७. | क्राऊड नाटय संस्थेकडून एकपात्री अभिनय स्पर्धा दि.०४/०६/२०२३ रोजी जोशी विद्यालय, डोबिवली येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सुनिल पाडुरंग वाघमोडे हा विद्यार्थी सहभागी झाला होता. |

| | |
|---|---|
| | **नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ:** |
| ७८. | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळमार्फत व Uddyam-PAHSUI Foundation अंतर्गत २४ इनक्युबेटर उधोजकांसाठी औद्योगिक व आर्थिक विकासास चालना देण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरिता "Business Opportunities in detence & Support to Budding Entrepreneurs" या विषयावर दि.११ एप्रिल, २०२३ रोजी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. |
| ७९. | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ अंतर्गत रब्बी ज्वारी सोलापूर केंद्र व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमानाने दि.२१ एप्रिल, २०२३ रोजी "Millet Startup Feast" हे कार्यक्रम विद्यापीठातील सर्व शैक्षणिक संकुलाचे मा. संचालक, नियमित व कंत्राटी शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता. |
| ८०. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ अंतर्गत Uddyam-PAHSUI Foundation मार्फत २५ नवउद्योजकांची नोंदणी करण्यात आली आहे. |
| ८१. | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळमार्फत व Uddyam-PAHSUI Foundation व कौशल्य विकास केंद्र Skillathon-२०२३ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये १४९ अर्ज आले होते. त्यामधून ६ उत्कृष्ट आयडियांना पारितोषिक देण्यात आले. सदर पारितोषिक वितरण कार्यक्रम दिनांक २२ जून, २०२३ रोजी विद्यापीठातील सभागृहात मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जयंत कुलकर्णी मा. कार्यकारी संचालक, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. |
| | **आरोग्य केंद्र व आरोग्य विज्ञान संकुल:** |
| ८२. | महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथील वैद्यकीय विद्यार्थ्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत दि.०२ जुलै, २०२३ ते १६ जुलै, २०२३ या कालावधीत **"समर इंटर्नशिप"** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सदर इंटर्नशिप कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध वैद्यकीय, आयुर्वेदिक तसेच दंत वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. |
| | **भौतिकशास्त्र संकुल:** |
| ८३. | संकुलामधील भौतिकशास्त्र व ईलेक्ट्रॉनिक्स या विषयाच्या विद्यार्थ्यांकरीता दि.११/०१/२०२३ रोजी गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले. |
| ८४. | संकुलामध्ये भौतिकशास्त्र या विषयासाठी दि.२४/०३/२०२३ रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. |
| ८५. | संकुलामधील ईलेक्ट्रॉनिक्स या विषयाच्या विद्यार्थ्यांकरीता दि.२५/०३/२०२३ रोजी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आसुन त्यामध्ये डॉ. टी. एच. मुजावर, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर यांनी मार्गदर्शन केले. |
| ८६. | संकुलामध्ये इलेक्ट्रॉनिक्स या विष्यासाठी दि.०८/०५/२०२३ व दि.०९/०५/२०२३ रोजी गेस्ट लेक्चर आयोजन करण्यात आलेले असून त्यामध्ये श्री. परमानंद अशोक पवार यांनी मार्गदर्शन केले. |
| ८७. | संकुलामध्ये इलेक्ट्रॉनिक्स या विषयासाठी दि.२६/०५/२०२३ रोजी गेस्ट लेक्चर आयोजन करण्यात आलेले आसून त्यामध्ये श्री. विवेक विष्णू सरडल यांनी मार्गदर्शन केले. |

| | |
|---|---|
| ८८. | संकुलामध्ये भौतिकशास्त्र व ईलेक्ट्रॉनिक्स या विषयासाठी दि.०६/०६/२०२३ ते ११/०६/२०२३ रोजी गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले. |
| ८९. | संकुलाकडील इतर दैनंदिन कामकाज आढावा व परिपूर्तता करणचे कामे चालू आहेत. |
| | **रसायनशास्त्र संकुल:** |
| ९०. | PET-८ च्या विधार्थीसाठी Course Work Programme चे आयोजन करण्यात आलेले आहे. |
| ९१. | रसायनशास्त्र संकुलातील M. Sc. च्या विधार्थीसाठी SET-NET Workshop चे आयोजन करण्यात आलेले आहे. |
| ९२. | M.Sc. च्या सर्व विधार्थीसाठी IQSC & Scientific Instrumentation Centre, School of Chemical Science च्या वतीने "Hands on -Training on FTIR" चे २८ एप्रिल, २०२३ रोजी आयोजन करण्यात आलेले आहे. |
| ९३. | M. Sc. च्या सर्व विधार्थीसाठी IPR Workshop चे आयोजन करण्यात आलेले आहे. |
| ९४. | Orginic Chemistry, Medicinal Chemistry, Polymer Chemistry, Industrial Chemistry च्या विधार्थीना Implant Training साठी Smruti Organic, Wamshi Laboratory, Kothari Pipes etc,येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. |
| ९५. | M.Sc. II च्या विधार्थीसाठी Placement Cell Of School Of Chemical Sciences च्या वतीने Placement Drive चे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये Vikalp Industries & Vamasi Ind. Ltd. या कंपन्यानी सहभाग घेतला होता. |
| ९६. | M.Sc. II Organic Chemistry मधील विधार्थी कु.अतुल पेठे,यशवंत भोसले, सृष्टी राजोल,यांनी GATE परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. |
| ९७. | M.Sc. च्या विधार्थीनी Traditional day आणि Sports day साजरे केले. |
| ९८. | संकुलात स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण केलेले आहे. |
| ९९. | रसायनशास्त्र संकुलाकडील अध्यापकांनी आंतरराष्ट्रीय शोध पत्रिकेमध्ये २० संशोधन पेपर प्रसिद्ध केलेले आहेत |
| | **संगणकशास्त्र संकुल:** |
| १००. | संगणकशास्त्र संकुलातील संख्याशास्त्र अधिविभागामार्फत दि.११/०३/२०२३ रोजी Statistical Analysis Using Python या एकदिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले |
| १०१. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व Quick Heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०९/०३/२०२३ रोजी Cyber Shiksha For Cyber Suraksha Award-२०२३ चे आयोजन करण्यात आले. |
| १०२. | संगणकशास्त्र संकुलाच्यावतीने दि.१८/०३/२०२३ ते दि.२१/०३/२०२३ या कालावधीमध्ये संख्याशास्त्र, गणित, कॉम्प्युटर सायन्स या विषयाच्या सेट / नेट पेपर क्रं. २ परीक्षेसाठी ऑनलाईन / ऑफलाईन पद्धतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. |
| १०३. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व Winning Leap Education Pvt. Ltd. Mumbai (LearnQoch) यांच्यामध्ये सांमजस्य करार करण्यात आला. |
| १०४. | संगणकशास्त्र संकुलामध्ये गणित अधिविभागामार्फत Artificial Intelligence या विषयावर दि.२६/४/२०२३ रोजी एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. |

| | |
|---|---|
| | **भाषा व वाङ्मय संकुल:** |
| १०५. | वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस " मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. भाषा व वाङमय संकुल मराठी विभागातर्फे, लेखक सन्मान व विशेष व्याख्यानाचे आयोजन दि.२७/०२/२०२३ रोजी करण्यात आले होते. |
| १०६. | भाषा व वाङमय संकुलातील विविध विषयावर एक दिवसीय सेट-नेट कार्यशाळेचे आयोजन ऑफलाईन / ऑनलाईनद्वारे दोन सत्रात करण्यात आले होते. |
| १०७. | भाषा व वाङमय संकुल पाली विभागातर्फे "विपस्सना अनापना सति" कार्यशाळेचे आयोजन नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ विभागाकडील उद्यम हॉल येथे करण्यात आले होते. |
| १०८. | भाषा व वाङ्मय संकुलाच्या वतीने दि.२९/०५/२०२३ ते ०८/०६/२०२३ दरम्यान तीन सत्रामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, प्राकृत, कन्नड या विषयाकरिता पीएच.डी. कोर्सवर्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. |
| | **सामाजिकशास्त्रे संकुल:** |
| १०९. | 1) Data Science and Machine Learning in Economics have been started for the economics Student.<br>2) Ph. D. Course Work was conducted for the Ph. D. enrolled students.<br>3) SET/ NET Work shop have been organized for the PG students. |
| | **Department of A.I.H.C.& A.:** |
| ११०. | प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्त्व शास्त्र विभागातर्फे २३फेब्रुवारी २०२३ रोजी One Day International Seminar on Early Historic Archaeology of South Asia: Recent Perspectives या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. |
| १११. | २४ २५ व २६ फेब्रुवारी रोजी विभागातर्फे डॉक्टर माया पाटील मॅडम यांच्या नेतृत्वाखाली निलंगा नीलकंठेश्वर मंदिर येथील मंदिरांना भेट देण्यात आली व औसा किल्ला जि. लातूर येथे उत्खननात सहभाग घेतला. |
| ११२. | २० मार्च रोजी प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्त्व शास्त्र विभागातर्फे Net- पुरातत्व शास्त्र पेपर क्रमांक दोन व इतिहास पेपर क्रमांक दोन या विषयासाठी नेट- सेट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. |
| ११३. | प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्त्व शास्त्र विभागातर्फे २७ मे, २०२३ रोजी वेळापूर, महाळुंग, निरा-नरसिंहपुर या ठिकाणी फिल्ड वर्क चे आयोजन करण्यात आले होते. |
| ११४. | प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्त्व शास्त्र विभागातर्फे २९ मे, २०२३ ते ०७ जून, २०२३ रोजी PET ८, PH. D Course Work Programme in A.I.H.C & Archaeology अंतर्गत कोर्स वर्क कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. |
| | **Research Project:** |
| ११५. | Prof. Dr. G. S. Kamble, Submitted Major Research Project Proposal to ICSSR New Delhi entitled "Socio-Economic Study of Rural Landless Agriculture Labour in Maharashtra". Proposed budget of the study Rs.14,80,750/-. |
| | **वाणिज्य व व्यवस्थापन संकुल:** |
| ११६. | दि.२१/०१/२०२३ रोजी एम. बी. ए. शै. वर्ष २०२२-२३ प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी "Principle of Management" या विषया अंतर्गत बिझनेस प्लॅन स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. |
| ११७. | दि.१२/०४/२०२३ रोजी एम. बी. ए. व एम. कॉम. च्या विद्यार्थ्यांसाठी Campus drive for Banking and Finance Sector in Collaboration with IBFSA is arranging a Placement Drive या विषयामध्ये Placement Drive घेण्यात आलेले आहे. |

| | |
|---|---|
| | **ललितकला व कला संकुल:** |
| ११८. | ललितकला व कला संकुलातील एम. ए. संगीत गायन, संगीत तबला, पखवाज व एम. ए. नाटयशास्त्र या विभागाकडे दि.२३ व २४ मार्च, २०२३ रोजी "नेट" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते सदर व्याख्यानास संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. |
| ११९. | ललितकला व कला संकुलातील राष्ट्रीय स्तर व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये परितोषिके प्राप्त झालेल्या ०३ माधव लिमये, गोल्ड मेडल निशांद व्यास, गोल्ड मेडल गीता जोंगदड उत्तेजनार्थ विद्यार्थ्याचा सत्कार समारंभ दि. ०६ एप्रिल, २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. |
| | **मुलांचे व मुलींचे वसतिगृह:** |
| १२०. | विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणाकरीता महिला व पुरूष निवासी गृहपालांची नेमणुक करण्यात आलेली आहे. |
| १२१. | वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याकरीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. |
| १२२. | मुलींना योगा प्रशिक्षण देण्यात येत आहे. |

**तद्नंतर सदर बैठकीत कामकाजपत्रकानुसार पुढीलप्रमाणे कामकाज झाले.**

[ १ ] **१) अधिसभेच्या दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.**

**२) अधिसभेच्या दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या ३० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.**

१) अधिसभेची २९ वी बैठक शनिवार, दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ३१०५, दि.११/०५/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.११/०५/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.२५/०५/२०२३ अशी होती. या मुदतीत श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी पान नं.१२ वरील विषय क्र.५ मधील ठरावामध्ये दुरुस्ती सुचविली असून ती खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे दुरुस्त ठराव स्वीकारलेला आहे.

**मूळ ठराव क्र.५:**

| | | |
|---|---|---|
| ठराव: | एक प्राचार्य | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (ल) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी प्राचार्य डॉ. राजेंद्रकुमार शेंडगे यांनी प्राचार्य डॉ. कैलास करांडे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास प्राचार्य डॉ. शंकरराव पाटील यांनी अनुमोदन दिले. तर प्राचार्य डॉ. निवृत्ती पवार यांनी प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. मंगेश वेदपाठक यांनी अनुमोदन दिले. त्यामध्ये प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांनी माघार घेतल्याने प्राचार्य डॉ. कैलास करांडे यांचे बिनविरोध नामनिर्देशन करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | एक अध्यापक | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (f) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी डॉ. सुशील कुमार शिंदे यांनी डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. शिरीष भोसले यांनी अनुमोदन दिले. तर श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी डॉ. विरभद्र दंडे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास ॲड निता मंकणी यांनी अनुमोदन दिले. तसेच श्री. माधव देशपांडे यांनी डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास प्रा. डॉ. धन्यकुमार बिराजदार यांनी अनुमोदन दिले.<br>तद्नंतर डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी माघार घेतल्याने एका जागेसाठी दोन उमेदवारांची नावे आल्यामुळे २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.१३(१) नुसार प्रस्तावाच्या बाजुने व प्रस्तावाच्या विरुध्द हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांना ३५ मते व डॉ. विरभद्र दंडे यांना १८ मते पडल्याने डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांचे बहुमताने स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले. |
| | एक पदवीधर | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (g) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. समाधान पवार यांनी अनुमोदन दिले. तर डॉ. मंगेश वेदपाठक यांनी श्री. सुदर्शन मसु यादव यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास सुरज मस्के यांनी अनुमोदन दिले. तसेच डॉ. भगवान आदटराव यांनी श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. श्रीमती वंदना गवळी यांनी अनुमोदन दिले.<br>तद्नंतर श्री. सुदर्शन मसु यादव व श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी माघार घेतल्याने श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांचे बिनविरोध नामनिर्देशन करण्यात आले. |

**श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी खालीलप्रमाणे अधोरेखित केलेली दुरुस्ती सुचविली आहे.**

**मूळ ठराव क्र.५ दुरुस्तीसह:**

| | | |
|---|---|---|
| ठराव: | एक प्राचार्य | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (e) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी प्राचार्य डॉ. राजेंद्रकुमार शेंडगे यांनी प्राचार्य डॉ. कैलास करांडे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास प्राचार्य डॉ. शंकरराव पाटील यांनी अनुमोदन दिले. तर प्राचार्य डॉ. निवृत्ती पवार यांनी प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. मंगेश वेदपाठक यांनी अनुमोदन दिले. त्यामध्ये प्राचार्य डॉ. बब्रुवाहन रोंगे यांनी माघार घेतल्याने प्राचार्य डॉ. कैलास करांडे यांचे बिनविरोध नामनिर्देशन करण्यात आले. |
| | एक अध्यापक | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (f) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी डॉ. सुशील कुमार शिंदे यांनी डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. शिरीष भोसले यांनी अनुमोदन दिले. तर श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी डॉ. विरभद्र दंडे यांच्या |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| | | नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास ॲड निता मंकणी यांनी अनुमोदन दिले. तसेच श्री. माधव देशपांडे यांनी डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास प्रा. डॉ. धन्यकुमार बिराजदार यांनी अनुमोदन दिले.<br>तद्नंतर डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी माघार घेतल्याने एका जागेसाठी दोन उमेदवारांची नावे आल्यामुळे २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.१३(१) नुसार प्रस्तावाच्या बाजुने व प्रस्तावाच्या विरुध्द हात वर करुन मतदान घेण्यात आले असता, डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांना ३५ मते व डॉ. विरभद्र दंडे यांना १८ मते पडल्याने डॉ. श्रीमती सीमा गायकवाड यांचे बहुमताने स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात आले. |
| | एक पदवीधर | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७० (३) (g) नुसार अधिसभेतून स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. समाधान पवार यांनी अनुमोदन दिले. तर डॉ. मंगेश वेदपाठक यांनी श्री. सुदर्शन मसु यादव यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास सुरज मस्के यांनी अनुमोदन दिले. तसेच डॉ. भगवान आदटराव यांनी श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला असता, त्यास डॉ. श्रीमती वंदना गवळी यांनी अनुमोदन दिले.<br>तद्नंतर श्री. सुदर्शन मसु यादव व श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी माघार घेतल्याने श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांचे बहुमताने निवड करण्यात आले. |

२) अधिसभेची ३० वी बैठक मंगळवार, दि.१४ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ३१०६, दि.११/०५/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.११/०५/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.२५/०५/२०२३ अशी होती. या मुदतीत श्री. अजितकुमार बापुराव संगवे, डॉ. मंगेश मोहन वेदपाठक व श्री. सुदर्शन मसु यादव यांनी दुरुस्ती सुचविली असून ती खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे दुरुस्त ठराव स्वीकारलेला आहे.

**मूळ जोडपत्र "अ" मधील खालील प्रश्ने:**

**प्रश्न क्र.१ मधील उपप्रश्न २ व प्रश्न क्र.२ मधील उपप्रश्न ३ प्रश्न क्र.३ मधील उपप्रश्न ३:**

| श्री. अजितकुमार बापुराव संगवे | | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
|---|---|---|
| प्रश्न १ | जोपर्यंत सर्व विद्यार्थ्याचे परीक्षा फॉर्म जनरेट होत नाहीत, तोपर्यंत परीक्षा फॉर्म भरण्याचे वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? | |
| उत्तर | वरील प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. | |
| | • | परीक्षा विभाग परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर करतो, परंतू, काही विद्यार्थ्यांचे आदल्या दिवशापर्यंत परीक्षा अर्ज जनरेट होत नाही असे वारंवार घडते यासाठी वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेचा सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जनरेट होतील. |

| | | |
|---|---|---|
| | ⇨ | परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी जाहीर करताना परीक्षा अर्ज उपलब्ध होतील याची आवश्यक माहिती घेऊनच तारखा जाहीर केल्या जातात. परंतू, संगणकीय तांत्रिक बाबी, बाह्य स्त्रोत फर्ममुळे काही वेळा दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होत नाहीत, अशा वेळी परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना मुदत वाढ दिली जाते. यावेळी विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क ही आकारले जात नाही. यापुढे दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होतील याची दक्षता घेण्यात येईल किंबहुना दिलेल्या तारेखपूर्वी फॉर्म जनरेशन, परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील याची खात्री झालेनंतरच परीक्षा अर्ज भरण्याची मुदत देण्यात येईल. |
| | • | हॉल तिकीट वेळेत जनरेट होण्यासाठी विद्यापीठाकडून काही उपाययोजना करण्यात येणार आहेत का? |
| | ⇨ | |
| प्रश्न २ | जोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाहीत, तोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अंतिम वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? | |
| उत्तर | प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार अंतिम वेळापत्रक प्रसिध्द झाल्यानंतरच संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होतात. | |
| | • | परीक्षा हॉल तिकिट बाबतीत विद्यार्थ्यांची ओरड आहे. परीक्षा उद्या आहे आणि आदल्या दिवसापर्यंत काही विद्यार्थ्याचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाही यासाठी अंतिम वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेच्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षेचे हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | ⇨ | पुढच्या परीक्षेवेळी एक आठवडा अगोदर हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | • | बी.ए.ची पदवी असेल तर ३ + २ असा नवीन नियम निघाला आहे. अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म त्यांचे पाच वर्ष पूर्ण झाले असताना ही काही महाविद्यालयांनी त्यांचे परीक्षा फॉर्म भरुन घेतले आहेत. तर त्या महाविद्यालयांना आपण तशा सूचना दिल्या नव्हता का? सूचना दिल्या असतील तर परीक्षा फॉर्म का भरुन घेतले जात आहेत, यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे. |
| | ⇨ | सदरचा प्रश्न हा N+२ UGC नियमाशी संबंधित आहे. दि.२१ फेब्रुवारी, २०१६ ला विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे पत्र व विद्यापीठाने निर्णय घेतलेले पत्र सर्व महाविद्यालयांना पाठविलेले होते. यामध्ये N+२ ही सिस्टम Adopt करण्यात आली असल्याचे कळविले होते. |
| | • | काही विद्यार्थ्यांचे जुने हॉलतिकीट जनरेट झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी नवीन जनरेट झालं, पण जुने हॉलतिकीट त्यांना वाटण्यात आलेली होती, आणि त्याचे सेंटर बदललेले होते, आत जे सेंटर बदललेल विद्यार्थी दुसऱ्या सेंटर मध्ये गेले, मग त्यामध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच नुकसान विद्यापीठ भरुन देईल का? |
| | ⇨ | हॉलतिकीट संदर्भात जे सांगितल होत ते फारच अगोदर झाल होत, २० ते २५ दिवस अगोदर झालेलं होत. त्याच्यानंतर आपल्याला कळाल्यानंतर १० दिवस असताना ती माहिती कळाली, त्यानंतर आपण त्या वेंडरला कळविले, त्यानंतर ८ दिवस असताना, ते बदल करुन त्यांच्याप्रमाणे हॉलतिकीट जनरेट करण्यात आला, आणि त्या सर्व महाविद्यालयांना परीक्षा विभागातून कळविले गेले, आणि त्यांनी डाऊनलोड कराच होत. |

| | | |
|---|---|---|
| | • | आता जे परीक्षा सुरु आहे, फॉर्म भरुन घेणे, हॉलतिकीट जनरेट करणे व परीक्षा Conduct करणे या सगळ्या प्रोसेसला सुसुत्रता यायला किती वेळ लागेल? |
| | ⇨ | |
| | • | एल. एल. एम. चे दोन विद्यार्थी आहेत, त्यांनी रीतसर तक्रार पण केलेली आहे परीक्षा नियंत्रक सरांकडे, त्यांची पहिल्या टर्मची परीक्षा झालेली आहे, आणि दुसऱ्या टर्मची Internal वगैरे सर्व झालाय, आणि सेकंड सेमिस्टरला त्यांना परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, त्यांना विद्यापीठाकडून पत्र गेलेल आहे की, एल. एल. बी. आणि एल. एल. एम. मधला गॅप आहे त्यामूळे त्यांना या परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, पहिल्या परीक्षेच्या वेळेस हे लक्षात यायला पाहिजे होत, विद्यापीठाच्या आणि परीक्षा नियंत्रकाच्या की त्यांना पहिल्यांदा बसू दिल आणि दुसऱ्यांदा Internal Exam झाली आणि दुसऱ्या परीक्षेला त्यांना बसू दिले नाही, मग आता त्यांच नुकसान आणि शेवटच सेमिस्टर आहे, त्यांच नुकसान कस भरुन काढता येईल? |
| | ⇨ | N+२ हे जे आहे Natural Period आणि २ वर्ष Additional त्याच्यापेक्षा त्यांना एक परीक्षा जास्त द्यायला येत नाही. त्यासाठी आपण Computerised reduction केलेल आहे. ५ वर्षापर्यंत परवानगी मिळते ५ वर्ष संपले की नाही. |
| **डॉ. मंगेश मोहन वेदपाठक** | | **प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार** |
| प्रश्न ३ | | विद्यापीठाच्या केसेससाठी नियुक्तीचे निकष व वकिलांची फी देण्यासाठी कोणते नियम लावले जातात व प्रत्येक केससाठी किती फी देणे अभिप्रेत आहे? |
| उत्तर | | विद्यापीठ केसेससाठी व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार विविध न्यायालयात कामकाज पाहण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पॅनल ॲडव्होकेटपैकी वकीलांचे नामनिर्देशन मा.कुलगुरु यांनी केल्यानंतर नियुक्ती करण्यात येवून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संबंधित वकीलांना फी अदा करण्यात येते. तसेच पॅनल बाहेरील वकील नेमण्याबाबत मा. कुलगुरु यांनी केलेल्या नामनिर्देशनानुसार संबंधित वकीलांना नेमण्यात येवून मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने फी अदा करण्यात येते. |
| | • | ही जे काही फी आहे ते तारखेनुसार घेतली जाते का केस नुसार दिली जाते, तारखेनुसार असेल तर Actualy Amount किती आहे? |
| | ⇨ | सोलापूर न्यायालय, विद्यापीठ महाविद्यालय न्यायालय, पुणे येथील वकीलाच्या व्यावसायिक फीमध्ये २५% ची वाढ झाल्याने (६,०००/- + १,५००/-) एकूण ७,५००/- दिली जाते. तसेच मा. उच्च न्यायालयातील वकिलांना १०,०००/- ला २५% वाढ अशा पध्दतीने फी ठरविलेली आहे आणि बाकीच्या फी केसनुसार असतात. |
| | • | एका केससाठी एकापेक्षा जास्त वकील नियुक्त असतील, तर त्यांना प्रत्येकी वेगवेगळी फी दिली जाते की त्या केससाठी ठरलेली फी ही विभागून दिली जाते. |
| | ⇨ | पॅनल केलेला असतो. त्यामुळे त्या पॅनलप्रमाणे फी दिली जाते. |
| | • | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय पॅनेलच्या बाहेरचे वकील नेमण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात आहे का? |
| | ⇨ | |

श्री. अजितकुमार बापुराव संगवे, डॉ. मंगेश मोहन वेदपाठक व श्री. सुदर्शन मसु यादव यांनी खालीलप्रमाणे अधोरेखित केलेली दुरुस्ती सुचविली आहे.

**जोडपत्र "अ" मधील खालीलप्रमाणे दुरुस्ती केलेली प्रश्नेः**

**प्रश्न क्र.१ मधील उपप्रश्न २ व प्रश्न क्र.२ मधील उपप्रश्न ३ प्रश्न क्र.३ मधील उपप्रश्न ३:**

| श्री. अजितकुमार बापुराव संगवे | | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
|---|---|---|
| प्रश्न १ | | जोपर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म जनरेट होत नाहीत, तोपर्यंत परीक्षा फॉर्म भरण्याचे वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? |
| उत्तर | | वरील प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |
| | • | परीक्षा विभाग परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर करतो, परंतू, काही विद्यार्थ्यांचे आदल्या दिवशापर्यंत परीक्षा अर्ज जनरेट होत नाही असे वारंवार घडते यासाठी वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेचा सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जनरेट होतील. |
| | ⇨ | परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी जाहीर करताना परीक्षा अर्ज उपलब्ध होतील याची आवश्यक माहिती घेऊनच तारखा जाहीर केल्या जातात. परंतू, संगणकीय तांत्रिक बाबी, बाह्य स्त्रोत फर्ममुळे काही वेळा दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होत नाहीत, अशा वेळी परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना मुदत वाढ दिली जाते. यावेळी विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क ही आकारले जात नाही. यापुढे दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज जनरेट होतील याची दक्षता घेण्यात येईल किंबहुना दिलेल्या तारेखपूर्वी फॉर्म जनरेशन, परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील याची खात्री झालेनंतरच परीक्षा अर्ज भरण्याची मुदत देण्यात येईल. |
| | • | हॉल तिकीट वेळेत जनरेट होण्यासाठी विद्यापीठाकडून काही उपाययोजना करण्यात येणार आहेत का? |
| | ⇨ | **संबंधित कामकाजाकरिताचे सॉफ्टवेअर मधील त्रुटी दुर करुन हॉल तिकीट वेळेत जनरेट करण्याची काळजी घेण्यात येईल.** |
| प्रश्न २ | | जोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाहीत, तोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अंतिम वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? |
| उत्तर | | प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार अंतिम वेळापत्रक प्रसिध्द झाल्यानंतरच संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होतात. |
| | • | परीक्षा हॉल तिकिट बाबतीत विद्यार्थ्यांची ओरड आहे. परीक्षा उद्या आहे आणि आदल्या दिवसापर्यंत काही विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाही यासाठी अंतिम वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर किती दिवस अगोदर संबंधित परीक्षेच्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षेचे हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | ⇨ | पुढच्या परीक्षेवेळी एक आठवडा अगोदर हॉल तिकीट जनरेट होतील. |
| | • | बी.ए.ची पदवी असेल तर ३ + २ असा नवीन नियम निघाला आहे. अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म त्यांचे पाच वर्ष पूर्ण झाले असताना ही काही महाविद्यालयांनी त्यांचे परीक्षा फॉर्म भरुन घेतले आहेत. तर त्या महाविद्यालयांना आपण तशा सूचना दिल्या नव्हता का? सूचना दिल्या असतील तर परीक्षा फॉर्म का भरुन घेतले जात आहेत, यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | ⇨ | सदरचा प्रश्न हा N+२ UGC नियमाशी संबंधित आहे. दि.२१ फेब्रुवारी, २०१६ ला विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे पत्र व विद्यापीठाने निर्णय घेतलेले पत्र सर्व महाविद्यालयांना पाठविलेले होते. यामध्ये N+२ ही सिस्टम Adopt करण्यात आली असल्याचे कळविले होते. |
| | • | काही विद्यार्थ्यांचे जुने हॉलतिकीट जनरेट झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी नवीन जनरेट झालं, पण जुने हॉलतिकीट त्यांना वाटण्यात आलेली होती, आणि त्याचे सेंटर बदललेले होते, आत जे सेंटर बदललेल विद्यार्थी दुसऱ्या सेंटर मध्ये गेले, मग त्यामध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच नुकसान विद्यापीठ भरुन देईल का? |
| | ⇨ | हॉलतिकीट संदर्भात जे सांगितल होत ते फारच अगोदर झाल होत, २० ते २५ दिवस अगोदर झालेलं होत. त्याच्यानंतर आपल्याला कळाल्यानंतर १० दिवस असताना ती माहिती कळाली, त्यानंतर आपण त्या वेंडरला कळविले, त्यानंतर ८ दिवस असताना, ते बदल करुन त्यांच्याप्रमाणे हॉलतिकीट जनरेट करण्यात आला, आणि त्या सर्व महाविद्यालयांना परीक्षा विभागातून कळविले गेले, आणि त्यांनी डाऊनलोड कराच होत. |
| | • | आता जे परीक्षा सुरु आहे, फॉर्म भरुन घेणे, हॉलतिकीट जनरेट करणे व परीक्षा Conduct करणे या सगळ्या प्रोसेसला सुसुत्रता यायला किती वेळ लागेल? |
| | ⇨ | <u>मार्च/एप्रिल, २०२३ परीक्षा सुरु होण्यापूर्वी या सर्व बाबींमध्ये सुसुत्रता आणण्यात येईल.</u> |
| | • | एल. एल. एम. चे दोन विद्यार्थी आहेत, त्यांनी रीतसर तक्रार पण केलेली आहे परीक्षा नियंत्रक सरांकडे, त्यांची पहिल्या टर्मची परीक्षा झालेली आहे, आणि दुसऱ्या टर्मची Internal वगैरे सर्व झालाय, आणि सेकंड सेमिस्टरला त्यांना परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, त्यांना विद्यापीठाकडून पत्र गेलेल आहे की, एल. एल. बी. आणि एल. एल. एम. मधला गॅप आहे त्यामूळे त्यांना या परीक्षेला बसू देण्यात आलेल नाही, पहिल्या परीक्षेच्या वेळेस हे लक्षात यायला पाहिजे होत, विद्यापीठाच्या आणि परीक्षा नियंत्रकाच्या की त्यांना पहिल्यांदा बसू दिल आणि दुसऱ्यांदा Internal Exam झाली आणि दुसऱ्या परीक्षेला त्यांना बसू दिले नाही, मग आता त्यांच नुकसान आणि शेवटच सेमिस्टर आहे, त्यांच नुकसान कस भरुन काढता येईल? |
| | ⇨ | N+२ हे जे आहे Natural Period आणि २ वर्ष Additional त्याच्यापेक्षा त्यांना एक परीक्षा जास्त द्यायला येत नाही. त्यासाठी आपण Computerised reduction केलेल आहे. ५ वर्षापर्यंत परवानगी मिळते ५ वर्ष संपले की नाही. |

| डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
|---|---|
| प्रश्न ३ | विद्यापीठाच्या केसेससाठी नियुक्तीचे निकष व वकिलांची फी देण्यासाठी कोणते नियम लावले जातात व प्रत्येक केससाठी किती फी देणे अभिप्रेत आहे? |
| उत्तर | विद्यापीठ केसेससाठी व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार विविध न्यायालयात कामकाज पाहण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पॅनल ॲडव्होकेटपैकी वकीलांचे नामनिर्देशन मा.कुलगुरु यांनी केल्यानंतर नियुक्ती करण्यात येवून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संबंधित वकीलांना फी अदा करण्यात येते. तसेच पॅनल बाहेरील वकील नेमण्याबाबत मा. कुलगुरु |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| | यांनी केलेल्या नामनिर्देशनानुसार संबंधित वकीलांना नेमण्यात येवून मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने फी अदा करण्यात येते. | |
| | • | ही जे काही फी आहे ते तारखेनुसार घेतली जाते का केस नुसार दिली जाते, तारखेनुसार असेल तर Actualy Amount किती आहे? |
| | ⇨ | सदरची फी विद्यापीठाच्यावतीने केसनिहाय अदा करण्यात येते. |
| | • | एका केससाठी एकापेक्षा जास्त वकील नियुक्त असतील, तर त्यांना प्रत्येकी वेगवेगळी फी दिली जाते की त्या केससाठी ठरलेली फी ही विभागून दिली जाते. |
| | ⇨ | पॅनल केलेला असतो. त्यामुळे त्या पॅनलप्रमाणे फी दिली जाते. |
| | • | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय पॅनेलच्या बाहेरचे वकील नेमण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात आहे का? |
| | ⇨ | व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने वकिलांचे पॅनल नेमण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात नाही. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय पॅनल बाहेरचे वकिल नेमण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात असण्याचा प्रश्नच: उद्भवत नाही. तथापि, कुलगुरुंना कायद्याने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन कुलगुरु वकिलांचे पॅनल व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरीने तयार करुन घेऊ शकतात किंवा आवश्यकता / निकड भासल्यास स्वत:च्या अधिकारात ही नेमू शकतात व त्याची माहिती व्यवस्थापन परिषदेला देतात. |

सबब, वरील दुरुस्तीसह अधिसभेचा दि.०४ फेब्रुवारी, २०२३ व दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकींच्या कार्यवृत्तांताची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | १) अधिसभेच्या दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या २९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली.<br>२) अधिसभेच्या दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या ३० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची दुरुस्तीसह नोंद घेण्यात आली. |

[ २ ] १) अधिसभेच्या दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेली कार्यवाही विचारार्थ.

२) अधिसभेच्या दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेली कार्यवाही विचारार्थ.

टिपणी: अधिसभेची २९ वी बैठक शनिवार, दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ३१०५, दि.११/०५/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.११/०५/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.२५/०५/२०२३ पर्यंत विद्यापीठास कळवाव्यात असे कळविण्यात आलेले होते. या मुदतीत दोन अधिसभा सदस्यांची दुरुस्ती प्राप्त झालेली आहे.

तसेच अधिसभेची ३० वी बैठक मंगळवार, दि.१४ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२३ / ३१०६, दि.११/०५/२०२३ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.११/०५/२०२३ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.२५/०५/२०२३ पर्यंत विद्यापीठास कळवाव्यात असे कळविण्यात आलेले होते. या मुदतीत तीन अधिसभा सदस्यांची दुरुस्ती प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरचे ठराव / सूचना संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते.

सबब, अधिसभेच्या दि.०४ फेब्रुवारी, २०२३ व दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | १) अधिसभेच्या दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br>२) अधिसभेच्या दि.१४ मार्च, २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

**[ ३ ] २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील नियम क्र. ६ (१६) नुसार अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे.**

टिपणी: २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ नुसार, प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले उत्तर, २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील ६ (१४) अन्वये अधिसभेच्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

| | |
|---|---|
| ठराव: | प्रश्नोत्तराचा तास दुपारी ०१:०५ वाजता सुरु झाला व दुपारी ०२:०५ वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.१८ ते ४१ विचारता आले नाहीत. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न त्यावरील उत्तरे सोबत जोडली आहेत. (जोडपत्र “अ”) |

[ ४ ] **शै. वर्षे २०२१-२२ चा विद्यापीठाचा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेल्या १८ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६ (१) नुसार व्यवस्थापन परिषदेने वार्षिक अहवाल स्विकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेकरिता पाठविणे अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. संतोष वि. कोटी | अध्यक्ष |
| २ | प्राचार्य डॉ. शंकर द. नवले | उपाध्यक्ष |
| ३ | उपप्राचार्या डॉ. श्रीमती वंदना पुरोहीत | सदस्य |
| ४ | डॉ. श्रीमती अंजना सं. लावंड | सदस्य |
| ५ | डॉ. श्रीराम द. राऊत | सदस्य |
| ६ | श्री. मुकतार म. शेख | सदस्य - सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.२६ जून, २०२२ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.३० नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.३० | विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल स्विकारुन सर्वानुमते दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.<br>तसेच शुध्दलेखन दुरुस्तीकरीता मराठी विषयातील तज्ज्ञ समिती गठीत करण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरु महोदयांना देण्याचे सर्वानुमते ठरले. |

सबब, विद्यापीठाचा सन २०२१-२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेल्या १८ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | शै. वर्षे २०२१-२२ चा विद्यापीठाचा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेल्या १८ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

[ ५ ] **शासनाने दि. १६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची सर्वेक्षणासह तयार केलेली पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह विद्यापरिषदेस शिफारस केलेली असून विद्यापरिषदेकडून प्रस्तावित असलेल्या सम्यक योजना (बृहत आराखडा) बाबतच्या शिफारशीवर निर्णय घेण्याची बाब अधिसभेच्या विचारार्थ.**

टिपणी: मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.१६/०१/२०२३ रोजीच्या शासन पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या निर्देशानुसार व शासनाने वेळोवेळी ऑनलाईनद्वारे घेतलेल्या बैठकीतील निर्देशानुसार विविध घटकाकडून गुगल फॉर्म व Suggestion फॉर्मद्वारे माहिती घेऊन, शासनाच्या धोरणानुसार डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार कौशल्य आधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देऊन सर्वेक्षणासह सम्यक योजनेचे प्रारुप तयार केलेले आहे. सदरील प्रारुप अंतिम करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७ (१) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर करुन तयार करावी लागणार आहे. तद्नंतर व्यवस्थापन परिषदेमार्फत सदरील योजना विद्यापरिषद व अधिसभेत सादर करावी लागणार आहे.

शासनाने सम्यक योजनेसंदर्भात दि.२३/०५/२०२३ रोजी दुपारी ठिक ०३:१० वा. ऑनलाईन बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विहित कार्यवाही करुन शासनास दि.२०/०६/२०२३ पर्यंत सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठ विविध प्राधिकरणाची मंजूरी घेऊन शासनास सादर करावी लागणार आहे. त्यामुळे सदरची बाब अधिष्ठाता मंडळाच्या दि.२५/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर केली असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

**"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ चा पंचवार्षिक बृहत आराखडा दुरुस्तीसह मान्य करुन विद्यापरिषदेकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली."**

उक्त ठरावाच्या अनुरोधाने सदरील बाब दि.३१/०५/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आलेली होती. त्यावर विद्यापरिषदेने दि.३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**"शासनाने दि.१६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी विद्यापीठाने गठित केलेल्या अभ्यास समितीचे प्रारुप अंतिम करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."**

विद्यापरिषदेने दि.३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उक्त बाब व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता दिली असल्याने सदरील बाब व्यवस्थापन परिषद दि.२६/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आली होती. सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**"प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीच्या पंचवार्षिक सम्यक योजनेस (बृहत आराखडा) दुरुस्तीसह सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली."**

व्यवस्थापन परिषदेने दि.२६/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सदरील बाब दि.१०/०७/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आलेली आहे.

सबब, शासनाने दि.१६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची सर्वेक्षणासह तयार केलेली पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह विद्यापरिषदेस शिफारस केलेली असून विद्यापरिषदेकडून प्रस्तावित असलेल्या सम्यक योजना (बृहत आराखडा) बाबतच्या शिफारशीवर निर्णय घेण्याची बाब अधिसभेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **शासनाने दि. १६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची सर्वेक्षणासह तयार केलेली पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) व्यवस्थापन परिषदेने दुरुस्तीसह विद्यापरिषदेस शिफारस केलेली असून विद्यापरिषदेकडून प्रस्तावित असलेल्या सम्यक योजना (बृहत आराखडा) बाबतच्या शिफारशींना दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ ६ ] श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विविध अभ्यासक्रमाच्या संलग्नतेसाठी विद्यापीठाची एल. आय. सी. (Local Inquiry Committee) भेट देत असते. विनाअनुदानित अभ्यासक्रमासाठी शिक्षकेतर कर्मचारी नेमले आहेत का? याची तपासणी करणेबाबत सदर कमिटीस सुचित करावे आणि शिक्षकेतर कर्मचारी नेमले नसतील तर शिक्षकेतर कर्मचारी नेमणेबाबतचा मुददा कमिटीच्या अटीमध्ये समाविष्ट करावा, अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस (Academic Council) करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी मांडला. त्यास श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ ७ ] श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार दिला जातो. तो पुरस्कार प्रतिवर्षी विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे देण्यात यावा हा ठराव ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी मांडला. त्यास श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. अजितकुमार बापुराव संगवे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ ८ ] डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ संकुलातील / संलग्नीत महाविद्यालयातील संशोधन केंद्रास जोडलेल्या इतर महाविद्यालयातील संशोधक मार्गदर्शकांना संशोधन सल्लागार समिती (RAC) बैठकीस उपस्थित राहणेसाठी TA, DA, auto charges संबंधीत संशोधन केंद्राकडून अदा करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरीषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी मांडला. त्यास डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ ९ ] डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची photocopy मागविण्याबाबतची paper संख्येची मर्यादा शिथील करावी अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी मांडला. त्यास प्राचार्य डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

[ १० ] डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"Ph. D. theory paper च्या उत्तरपत्रीकेची छायांकीत प्रत विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार विहीत कालावधीमध्ये देण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा, परीक्षा व मुल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी मांडला. त्यास डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ ११ ] डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शारिरीक शिक्षण (आवश्यक) चे परीक्षा शुल्क जास्त असल्याने ते शुल्क कमी करावे अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मुल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडला. त्यास श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १२ ] ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विद्यापीठामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुलास "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा, व्यवस्थापन परीषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी मांडला. त्यास डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १३ ] ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या revaluation / photocopy प्रक्रीयेमध्ये संबंधीत विद्यार्थ्याचा निकाल उत्तीर्ण आल्यास विद्यार्थ्याची photocopy / revaluation फी विद्यार्थ्याला परत करावी अशी शिफारस ही अधिसभा, परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी मांडला. त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

[ १४ ] श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विद्यापीठामध्ये नव्याने बांधन्यात आलेल्या मुख्य इमारतीस "माजी मुख्यमंत्री डॉ. सुशिलकुमार शिंदे प्रशासकीय भवन" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परीषेदस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडला. त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १५ ] श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सर्व विद्यापीठ परीक्षांच्या उत्तरपत्रिका विविध महाविद्यालयातून विद्यापीठाकडे गोळा करण्यासाठी वाहनांची व्यवस्था विद्यापीठाने करावी अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी मांडला. त्यास डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ १६ ] श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे ग्रंथालय शुल्क जास्त असल्यामुळे ते शुल्क कमी करावे अशी शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी मांडला. त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १७ ] डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठाच्या अधिसभा बैठकीमध्ये विद्यापीठाच्या विकासात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. यासाठी विद्यापीठाच्या फक्त विकासात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी २ तास विद्यापीठ विकासासाठी [Two hourse for University Development] या स्वरुपाची स्वतंत्र अधिसभा बैठक वर्षातून किमान दोन वेळा घेण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी मांडला. त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ १८ ] डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"एम. फिल. व पीएच. डी. व्यतिरिक्त सर्व विद्याशाखांच्या सर्व पदव्युत्तर वर्गाचे लघु शोधप्रबंध, प्रकल्पअहवाल [Project Report] यांचे शिर्षक मान्यता प्रस्ताव व इतर सर्व प्रक्रिया RRC व CRC मध्ये न पाठवता संबंधीत महाविद्यालय स्तरावर करण्यास ही अधिसभा विद्यापरिषदेस शिफारस करीत आहे."

| ठराव: | सदरचा ठराव डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी मांडला. त्यास ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सवानुमते मान्य करण्यात आला. |
|---|---|

[ १९ ] ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"मे २०१८ पासून आजतागायत विदयापीठाच्या विविध न्याय प्रकरणात व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरी शिवाय विदयापीठाने नेमलेल्या सर्व वकिलांच्या नेमणूका रद्द करण्यात याव्यात व त्यांच्यावर व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय केलेला सर्व खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

ठराव: महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी अधिसभा समितीमध्ये विघटित करण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर नियम क्र. ९ (३) नुसार ३० सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिल्याने नियम क्र.९ (४) अन्वये प्रस्ताव मतास टाकण्यात आला असता, उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिल्याने तो संमत करण्यात आला. त्यामुळे नियम क्र. ९(५) अन्वये अधिसभेने स्वत:चे समितीमध्ये विघटन करण्याचा निर्णय घेतला आणि सदर विषयी चौकशी करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) राजनीश कामत<br>प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य |
| ३. | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य |
| ४. | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य |
| ५. | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ६. | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्य |
| ७. | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य |
| ८. | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्य |

समितीने सादर केलेला अहवाल पुढील अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

[ २० ] श्रीमती रोहिणी आर. तडवळकर यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"Covid-१९ महामारी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे दिलेले स्वातंत्र्य या बाबींचा विचार करुन विदयापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनाला अनुसरुन N+२ मध्ये अडकलेल्या सर्व विदयाशाखांच्या सर्व विदयार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी देण्यात यावी अशी शिफारस ही आधी सभा विदया परिषदेस करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्रीमती रोहिणी आर. तडवळकर यांनी मांडला. त्यास श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्रीमती रोहिणी आर. तडवळकर यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ २१ ] ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"शिवराज्याभिषेकास ३५० वर्ष पूर्ण होत आहेत. या विषयात एक समिती गठीत करुन शिवराज्याभिषेक वर्ष साजरा करण्यात यावे. यात व्याख्यानमाला, शिवचरित्र पारायण, शिवकालीन खेळाचे प्रशिक्षण, शिवकालीन युध्दनिती, शिवकालीन वस्तुंचे प्रदर्शन भरविणे इ. उपक्रम घेण्याबाबतची शिफारस ही अधिसभा विद्यार्थी विकास विभागास करत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत यांनी मांडला. त्यास श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ २२ ] श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सोलापूर जिल्हातील महाविदयालयातील विदयार्थ्यामध्ये व्यसनांचे प्रमाण वाढत चालले आहे. व्यसनाधीनतामुळे तरुणाईचे पर्यायीने देशाचे नुकसान होत आहे, त्यामुळे विदयार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी व्यसनमुक्ती अभियान, उपक्रम राबविण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा विदयार्थी विकास विभागास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी मांडला. त्यास श्री. माधव धोंडोपंत देशपांडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ २३ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विदयापीठ संकुलातील किंवा संलग्नित महाविदयालयातील विदयार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी विदयापीठ स्तरावर स्वतंत्र Grievance Cell सुरु करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा विदयापीठ प्रशासनास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास श्री. सुदर्शन मसु यादव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ २४ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विदयापीठ परिसरातील विविध संकुलातील संचालक व संलग्नित महाविदयालयातील प्राचार्य यांनी अभ्यासक्रमानुसार ७५ टक्के अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाल्यानंतर संबंधित विषयाच्या विभाग प्रमुखासह लेखी स्वरुपात विदयापीठात कळविण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळ तसेच विदयापरिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ २५ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विदयापीठ हे महामार्ग लगत असल्याने सदर विदयापीठाचे भव्य दिव्य व ऐतिहासिक असे प्रवेशद्वार बांधण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा इमारत व बांधकाम समितीस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ २६ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"प्रस्तुत विदयापीठामध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने व कामाचा व्याप पाहता सदर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर किंवा सुट्टीच्या दिवशी जादा काम करावे लागते, त्या पोटी त्यांना मिळणारे जादा कामाचा दर हे महागाई दराच्या तुलनेने खूपच कमी असल्याने जादा काम केल्यानंतर मिळणाऱ्या दरामध्ये सुधारणा करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास डॉ. भगवान नागनाथ आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ २७ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विदयापीठातील विविध अधिकारी व प्रशासकीय कार्यालयाची पत्रव्यवहार करावयाचा असल्यास तो छापील स्वरुपात पत्र न पाठवता संबंधित कार्यालयीन ईमेल आयडी वर पत्रव्यवहार करण्यात यावा यामुळे पर्यावरण जतन होईलच त्याबरोबर प्रशासनात गतिमत्ता वाढेल, अशी शिफारस ही अधिसभा विदयापीठ प्रशासनास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडला. त्यास श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ २८ ] श्री. सुदर्शन मसु यादव यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विदयापीठ परिसरातील विविध संकुलामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी शिक्षकांना वैदयकीय विमा योजना लागू करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सुदर्शन मसु यादव यांनी मांडला. त्यास श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. |

[ २९ ] श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"विद्यापीठ कॅम्पसमधील शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय विद्यार्थ्यांच्या साठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने फेलोशिप योजना सुरु करण्यात यावी."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी मांडला. त्यास डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

[ ३० ] श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"महाविद्यालयांच्या व विध्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाचे प्रशासकीय उपकेंद्र व शैक्षणिक संकुल पंढरपूर या ठिकाणी करण्यात यावे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा ठराव श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी मांडला. त्यास श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. |

मा. प्रभारी कुलगुरु, प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून वंदे मातरम नंतर बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

30.8.23

कुलसचिव
सदस्य सचिव, अधिसभा

प्रभारी कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा

जोडपत्र "अ"

## विषय क्र. ०२ चे सहपत्र
## अधिसभेच्या शुक्रवार, दि.२८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न त्यावरील उत्तरे

| अ.क्र. | | श्री. अजितकुमार बापुराव संगवे — श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
|---|---|---|
| १) | प्रश्न १ | अधिसभा बैठकीस स्थानिक आणि जिल्ह्यातील अधिसभा सदस्यांना उपस्थित राहिल्याबद्दल कोणता भत्ता देण्यात येतो? [वित्त व लेखा विभाग] |
| | उत्तर | व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९/०९/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र.१९(१९) अन्वये, अधिसभा बैठकीस उपस्थित राहणाऱ्या स्थानिक सदस्यांना व जिल्ह्यातून उपस्थित राहणाऱ्या सदस्यांना विशेष भत्ता (दैनिक भत्ता) ₹४००/- अदा करण्यात येतो. तसेच याऊपर जिल्ह्यातून उपस्थित राहणाऱ्या अधिसभा सदस्यांना नियमानुसार वेगळा प्रवास भत्ता अदा करण्यात येतो. |
| | | डॉ. शिरीष नागनाथ भोसले — डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा |
| २) | प्रश्न: १ | N+२ नियमावलीच्या अंमलबजावनी संदर्भातील गोंधळामुळे किती विद्यार्थी मागील परीक्षेपासून वंचीत राहीले आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | N+२ मुळे मागील परीक्षेपासून १३७ विद्यार्थी वंचीत राहिले आहेत असे संगणक प्रणालीमध्ये दिसून येते. |
| ३) | प्रश्न: २ | पदवी पूर्ण करण्यासाठीच्या कालावधीबाबत UGC च्या N+२ निर्णयाची अंमलबजावणी विद्यापीठाने कोणत्या वर्षापासून केली आहे? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | पदवी पूर्ण करण्यासाठीच्या कालावधीबाबत UGC च्या N+२ बाबतच्या दि.१५/१०/२०१५ रोजीच्या निर्णयाची अंमलबजावणी विद्यापीठाने विद्यापरिषदेच्या दि.१२/०१/२०१६ रोजीच्या २९ व्या बैठकीतील विषय क्र.४८ नुसार २०१६-१७ या वर्षापासून (प्रथम वर्षापासून) केली आहे. |
| | | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड — डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| ४) | प्रश्न: १ | आक्टोबर-नोव्हेंबर २०२२ च्या विद्यापीठ परीक्षेच्या प्रथम जाहीर केलेल्या निकालामध्ये RR, AB, OO निकाल असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | १) RR - ९९४ २) AB - NA ३) OO - २८,०९२ |
| | | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला — प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
| ५) | प्रश्न: १ | पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या किती paper च्या photocopy विद्यापीठाकडून मागविता येतात? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रत्येक सत्राच्या २ उत्तरपत्रिकांची Photocopy मागविता येते. |
| ६) | प्रश्न: २ | एखादया विषयाचा निकाल RR, OO, AB असल्यामुळे जर विद्यार्थ्यांने त्या विषयाचा परीक्षा फॉर्म भरला असेल आणि दरम्यान सुधारीत निकालामुळे त्याचा त्या विषयाचा निकाल उत्तीर्ण आला असेल तर त्या विद्यार्थ्याचे संबंधीत विषयाचे परीक्षा शुल्क परत दिले जाते काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | होय. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ॲड. उषा नंदकुमार पवार | | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
| ७) | प्रश्न: १ | विद्यापीठ परीक्षेचे फॉर्म ऑनलाईन जनरेट केल्यापासून संबंधीत फॉर्म भरण्यासाठी किती कालावधी दिला जातो? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | सर्वसाधारणपणे विद्यापीठ परीक्षेचे फॉर्म ऑनलाईन जनरेट केल्यापासून संबंधीत फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना १५ दिवस व महाविद्यालयांना ५ दिवस दिले जातात. अपवादात्मक परिस्थितीत कालावधी बदलला जाऊ शकतो. | |
| | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
| ८) | प्रश्न: १ | विद्यापीठ परीक्षेच्या निकालानंतर विहीत मुदतीत विद्यार्थ्याने photocopy / revaluation साठी अर्ज केल्यास व त्यानुसार तो विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास त्याची photocopy / revaluation शुल्क परत केली जाते काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | विद्यापीठ परीक्षेच्या निकालानंतर विहीत मुदतीत विद्यार्थ्यांने Photocopy/Revaluation साठी अर्ज केल्यास विद्यापीठ अध्यादेश क्र.०.१०६ (B) नुसार विद्यार्थ्यांच्या Revaluation मध्ये १०% (अधिक किंवा वजा) किंवा त्याहून अधिक गुणांमध्ये बदल होतो, अशावेळेस Revaluation शुल्क परत केले जाते. Photocopy चे शुल्क परत केले जात नाही. | |
| | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| ९) | प्रश्न: १ | आक्टोबर-नोव्हेंबर २०२२ च्या विद्यापीठ परीक्षांचे निकाल, परीक्षा झाल्यापासून किती दिवसामध्ये लावण्यात आले? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ मधील परीक्षांच्या निकालाचा तक्ता सोबत जोडला आहे. | |
| | डॉ. विरभद्र चनबस दंडे | | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे |
| १०) | प्रश्न: १ | अस्थायी अभ्यास मंडळामध्ये किती सदस्य असावेत आणि ते कुठल्या परिनियमाच्या अंतर्गत नेमण्यात आलेले आहेत? [अभ्यासमंडळे विभाग] | |
| | उत्तर | अस्थायी अभ्यासमंडळाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तदअनुषंगिक परिनियम क्र.५०४ नुसार पाच सदस्य नेमण्यात यावेत असा परिनियम आहे. | |
| ११) | प्रश्न: २ | अभ्यास मंडळे तयार करीत असतांना तत्कालीन मा. कुलगुरुंची दिशाभूल केली गेली आहे हे खरे आहे का? [अभ्यासमंडळे विभाग] | |
| | उत्तर | सदरबाबत माहिती उपलब्ध नाही. | |
| | प्रा. डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| १२) | प्रश्न: १ | आपल्या विदयापीठात कार्यरत असलेल्या कुलसचिव या, कुलसचिव पदाला पात्र आहे का? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | होय | |

| | | |
|---|---|---|
| १३) | प्रश्न: २ | त्या मुंबई विदयापीठ येथे उपकुलसचिव या पदावर कार्यरत असतांना त्यांचे नांव महाराष्ट्र शासनाच्या सर्वार्थ प्रणाली मध्ये होते का? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | महाराष्ट्र शासनाची सर्वार्थ प्रणाली अस्तित्वात नाही. |
| १४) | प्रश्न: ३ | त्यांच्या मुंबई येथील उपकुलसचिव या पदावरील वेतन निश्चिती झाली आहे का? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | होय, उपकुलसचिव या पदावरील वेतननिश्चिती झाली आहे. |
| | **श्री. सुदर्शन मसु यादव** | **डॉ. समाधान दिगंबर पवार** |
| १५) | प्रश्न: १ | मागील तीन सेमिस्टरचा निकाल लावण्यासाठी किती कालावधी लागला? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | मागील तीन सेमिस्टरच्या निकालाची माहिती सोबत जोडली आहे. **(सहपत्र १४ ते ३७)** |
| १६) | प्रश्न: २ | त्यासाठी किती स्फॉटवेअर वापरले गेले? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | सदरचा प्रश्न संदिग्ध असल्याने प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |
| १७) | प्रश्न: ३ | त्यासाठी आता पर्यत किती खर्च आला? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | सदरचा प्रश्न संदिग्ध असल्याने प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |

(सदस्य सचिव तथा कुलसचिव)
अधिसभा